नि.फौ.ख. क्रमांक.१६०/२०१८
सरकार विरुध्द वसंत व इतर
निशाणी क्रमांक – १०३.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०७**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव –धनराज रुकमाजी जगताप,
वय -५२ वर्षे, धंदा -शेती,
रा. गोताळा, ता.अहमदपूर जि.लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन.काकडे**

**०१.** मी सन २०१८ साली बालाजी गणपतराव कोदळे यांचे गाडीवर चालक म्हणून काम करित होतो. फिर्यादी माझ्या मामाचा मुलगा आहे. दिनांक १३/०८/२०१३ रोजी बालाजी कोदळे यांचे वाहनातुन फिर्यादीच्या गावी टाकळगाव येथे गेलो. त्यानंतर आम्ही पंरचडा येथे गेलो. त्यानंतर तेथे देवाचे दर्शन घेतल्यानंतर अहमदपूर अंबाजोगाई रोड वर असलेल्या हॉटेल विसावा येथे बालाजी कोदळ यांनी गाडी थांबवण्यास सांगितली. त्या ठिकाणी त्यांचे मेहुणे फिर्यादी यांना उचलून गाडीत टाकले. फिर्यादीच्या डोक्याला मार लागला होता. आम्ही फिर्यादीला अहमदपूर येथील देशमुख यांच्या हॉस्पीटल येथे दाखल केले. फिर्यादी शुध्दीवर आल्यानंतर त्यांना मारहाण केल्याचे सांगितले. त्यांनी असे सांगितले की, राहुल घोगरे, वसंत घोगरे, विकास घोगरे व एका अनोळखी इसमाने त्यांना मारहाण केली होती. पोलीसांनी माझे टिपन नोंदवले होते.

सरतपास पुर्ण.

**आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.व्ही.देशमुख यांच्यामार्फत सुरु:-**

**०२.** फिर्यादी माझा पाहुणा आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये पुर्वीपासुनच वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला झालेल्या मारहाणीची माहिती फिर्यादी यांनी सांगितल्यावरुन मला झाली, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नव्हती.

०३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १३/०८/२०१३ रोजी बालाजी कोदळे यांचे वाहनातुन फिर्यादीच्या गावी टाकळगाव येथे गेलो. त्यानंतर आम्ही पंरचडा येथे गेलो. त्यानंतर तेथे देवाचे दर्शन घेतल्यानंतर अहमदपूर अंबाजोगाई रोड वर असलेल्या हॉटेल विसावा येथे बालाजी कोदळ यांनी गाडी थांबवण्यास सांगितली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी त्यांचे मेहुणे त्यांना फिर्यादी यांनी उचलून गाडीत टाकले. फिर्यादीच्या डोक्याला मार लागला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही फिर्यादीला अहमदपूर येथील देशमुख यांच्या हॉस्पीटल येथे दाखल केले. फिर्यादी शुध्दीवर

आल्यानंतर त्यांना मारहाण केल्याचे सांगितले. त्यांनी असे सांगितले की, राहुल घोगरे, वसंत घोगरे, विकास घोगरे व एका अनोळखी इसमाने त्यांना मारहाण केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**फेर तपास** काही नाही. श्रवणोत्तर स्वीकृत,

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -२५.०२.२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.